**राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि भारती विद्यापीठ, यशवंतराव मोहिते महाविद्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यामाने दि. १४ ते १६ डिसेंबर २०१३ या कालावधीत आयोजित**

# राज्यस्तरीय सामाजिक, सांस्कृतिक स्पर्धा उत्कर्ष -२०१३

# अहवाल




## स्थळ: भारती विद्यापीठ, पुणे

## संघनायक: प्रा. डॉ. एन.एस. डोंगरे

# सामाजिक, सांस्कृतिक स्पर्धा उत्कर्ष -२०१३
# अहवाल

राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि भारती विद्यापीठ, यशवंतराव मोहिते महाविद्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यामाने **दि. १४ ते १६ डिसेंबर २०१३** या कालावधीत आयोजित **राज्यस्तरीय सामाजिक-सांस्कृतिक स्पर्धा उत्कर्ष-२०१३** मध्ये उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव चा संघ देखील सहभागी झाला होता. संघात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील विविध महाविद्यालयातून (९ तुली व ९ मुले) **१८ विद्यार्थ्यांची** निवड करण्यात आली होती. निवड प्रक्रियेसाठी मोराणे, जि. धुळे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालयात **निवड प्रक्रिया व सराव कार्यशाळा** घेण्यात आली होती. तसेच संघ व्यवस्थापक म्हणून **प्रा. डॉ. नागोराव शालीग्राम डोंगरे** (एस.पी.डी.एम. महाविद्यालय, शिरपूर) यांची निवड करण्यात आली होती. तर संघ प्रशिक्षक म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचा वरिष्ठ स्वयंसेवक **लोकेश चौधरी** (पूज्य साने गुरूजी विद्या प्रसारक मंडळ महाविद्यालय, शाहादा) यांची निवड करण्यात आली होती. असा २० लोकांचा संघ निर्माण करण्यात आला होता. संघात सहभागी विद्यार्थी पुढील प्रमाणे आहेत.

**१. संघात सहभागी विद्यार्थी** :

**प्रा. डॉ. नागोराव शालीग्राम डोंगरे एस.पी.डी.एम. महा. शिरपूर संघनायक**
**चौधरी लोकेश भास्कर पू.साने गुरूजी महा. शहादा संघप्रशिक्षक**

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव | महाविद्यालयाचे नाव | कला प्रकारातील सहभा |
|---|---|---|---|
| १. | खैरनार जितेंद्र भरत | पु.साने. गुरूजी वि.प्र.मं. शहादा | पथनाट्य |
| २. | सोनवणे मिनाश्री सुरेश | डॉ. बा. आ. समाजकार्य महा. मोराणे | पथनाट्य,समूहगीत, पोस्टर |
| ३. | पेंढारकर विशाखा राजेंद्र | एम.डी. पालेशा महा. धुळे | पथनाट्य |
| ४. | शिरवळकर श्रीपाद प्रदिप | प्रताप महा. अमळनेर | पथनाट्य, समूहगीत, वादन |
| ५. | जाधव किरण विनायक | डॉ. बा. आ. समाजकार्य महा. मोराणे | समूहगीत |
| ६. | थोरात मालती परशुराम | एस.पी.डी.एम. महा. शिरपूर | समूहगीत |
| ७. | चित्ते हर्षदा शशिकांत | डॉ. बा. आ. समाजकार्य महा. मोराणे | रॅली |
| ८. | वाघ धनश्री संजय | समाजकार्य महा. चोपडा | पथनाट्य,समूहगीत, काव्यवाचन |
| ९. | धनगर ईश्वर रामहरण | समाजकार्य महा. चोपडा | पथनाट्य, निबंध लेखन |
| १० | राजपूत करिश्मा हरिचंद्र | एम. डी. पालेशा महा. धूळे | पथनाट्य |
| ११ | लोखंडे प्रतिभा दिलीप | डॉ. बा. आ. समाजकार्य महा. मोराणे | निबंध लेखन |
| १२ | सुर्यवंशी तुषार सोमा | डॉ. बा. आ. समाजकार्य महा. मोराणे | छायाचित्रण |
| १३ | मासुळेघनश्याम वाल्मिक | डॉ. बा. आ. समाजकार्य महा. मोराणे | पथनाट्य |
| १४ | सैंदाणे दिपक किशोर | समाजकार्य महा. चोपडा | पथनाट्य, काव्यवाचन |
| १५ | बागुल निशा शांताराम | एस.पी.डी.एम. महा. शिरपूर | समूहगीत |
| १६ | साळूंके हर्षल सिध्दार्थ | कला, शास्त्र, वाणिज्य महा. चोपडा | पथनाट्य |
| १७ | अहिररावभाग्यश्री विनोद | डॉ. बा. आ. समाजकार्य महा. मोराणे | समूहगीत |
| १८ | अहिरे सतीश प्रकाश | झे.बी. पाटील महा. धूळे | वकृत्त्व स्पर्धा |

२. **स्वयंसेवक निवड व सराव**: उत्कर्षाच्या निवडीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे येथे **दि. ९ ते १२ डिसेंबर २०१३** या कालावधीत निवड व सराव कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. विविध महाविद्यालयातून आलेल्या विद्यार्थ्यांची विविध कला कौशल्यांची चाचणी घेऊन निवड करण्यात आली. निवड झालेल्या स्वयंसेवकांची १० ते १२ डिसेंबर या कालावधी दरम्यान विविध कला प्रकार बसवून त्याचा सराव घेण्यात आला. निवड व सराव प्रक्रियेत संघ प्रशिक्षक **लोकेश भास्कर चौधरी**, **प्रा. प्रमोद भुंबे, प्रा. सौ. वहाणे मॅडम** यांनी विशेष भूमिका पार पाडली. तसेच विविध गोष्टींसाठी मोराणे महाविद्यालयातील विविध **प्राध्यापक**, **शिक्षकेत्तर बांधव**, राष्ट्रीय सेवा योजनेचे **स्वयंसेवक विद्यार्थी** आणि **प्राचार्य डॉ. महाजन** सरांची विशेष मदत लाभली.

३. **संघाचा धुळे ते पुणे प्रवास**: दि. १२ डिसेंबर २०१३ रोजी दिवसभर सराव करून सांयकाळी ६.४५ ला संघ धुळयाकडे मार्गस्थ झाला. धुळयाला संघातील सर्व विद्यार्थी धुळे रेल्वे स्टेशन जमून ७.२० च्या पॅसेंजरने चाळीसगावला येथे पोहचला. चाळीसगावाला स्टेशनवर वेटींग रूममध्ये मा. पंकजकुमार नन्नवरे सर आणि मा. लध्धे सरांनी संघातील सर्व स्वयंसेवकांची भेट घेऊन मार्गदर्शन केले. रात्रीचे भोजन मोराणे महाविद्यालयाने संघासोबत पार्सल केले होते. रात्रीचे जेवन आटोपून संघ पहाटे २.५९ वा. भुसावळ पुणे गाडीने पुण्याकडे मार्गस्थ झाला. दि. १३ डिसेंबर ला सकाळी १२.०० वाजता पुणे स्टेशनला पोहचला. तेथून सीटी बसने भारती विद्यापीठात पोहचला. मुला-मुलींनी अंघोळी केल्यानंतर भारती विद्यापीठाबाहील स्माईल भोजनायात जेवन घेतले.

४. **संघाचे नोंदणी प्रक्रिया**: दि. १३ डिसेंबर २०१३ रोजी दुपारी ४.४५ वा. समूह प्रवेशिका आणि वैयक्तिक प्रवेशिका फॉर्म भरून नोंदणी प्रक्रिया आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह एक दिवस अगोदरच पूर्ण केली. प्रवेशिका नोंदणी प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची अडचण आली नाही.

५. **रॅलीतील सहभाग**: दि. १४ डिसेंबर २०१३ रोजी सकाळी ९.०० वाजता विविध विद्यापीठांच्या संघाची भव्य रॅली काढण्यात आली होती. रॅलीची थिम पर्यावरण व उर्जा बचत ही होती. त्या आपल्या विद्यापीठाच्या स्वयंसेवकांनी **प्लॅस्टीकचे दुष्परिणाम व कागदाचे महत्त्व दर्शविणारा मुका अभिनय** सादर







केला. परंतु विविध विद्यापीठांच्या संघाच्या तुलनेत आपल्या संघासोबत ढोलकी शिवाय कोणतेही वाद्य नसल्या कारणाने प्रेक्षकांचे अवधान फारशे खेचता आले नाही. थिम चांगली असूनही इतर वाद्यांच्या

आवाजाच्या गर्दीत प्रेक्षकांच्या पसंतीस पडली नाही. रॅलीत संघातील **सर्वच विद्यार्थी, संघनायक, संघ प्रशिक्षक आणि मा. पंकजकुमार नन्नवरे सर** सहभागी झाले होते.

६. **उत्कर्ष-२०१३ वे उद्घाटन**ः दि. १४ डिसेंबर २०१३ रोजी रॅलीच्या समाप्तीनंतर सकाळी ११.०० **मा. महामहीम राज्यपाल श्रीनिवास पाटील**, **मा. पंतगराव कदम वनमंत्री**, राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी **मा. अतुल सांळूके** यांच्या प्रमुख उपस्थीतीत आणि भारती विद्यापीठाचे **कुलगुरू महोदय मा. शिवाजीराव कदम** यांच्या अध्यक्षेतेखाली उद्घाटन समारंभ मोठया थाटात पार पडला.

७. **भितीचित्र व कार्यप्रसिध्दी अहवाल स्पर्धेचे उद्घाटन**ः उत्कर्ष सामाजिक, सांस्कृतिक स्पर्धांचा उद्घाटन समारंभ संपल्यानंतर प्रमुख पाहूण्यांच्या हस्ते भितीचित्र व कार्यप्रसिध्दी अहवाल स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने देखील सहभाग नोंदविला होता. परंतु अहवाल अल्पसा असल्या कारणास्तव त्याला कोणत्याही प्रकारचे पारितोषिक मिळू शकले नाही. अहवालमध्ये **२४ सप्टेंबर ते २ आक्टोबर २०१३** चे विद्यापीठातील विविध महाविद्यालयाने आणि विद्यापीठाने जे विविध उपक्रम राबविले त्यांचा उल्लेख आवश्यक होता. परंतु अगदी स्पर्धेच्या पूर्वीच्या दिवसी ईमेलव्दारे विद्यापीठातून संघनायकाच्या ईमेलवर पाठविण्यात आला. शिवाय तोही अगदी बारा पानांचा एका-दोन महाविद्यालयातील उपक्रमांचा उल्लेख केलेला अपूर्ण अहवाल प्राप्त करून देण्यात आला. तसेच भितीपत्र देखील स्पर्धेच्या अगोदरच्या दिवसी सांयकाळी ईमेलवर पाठविण्यात आले. वेळेवर भितीपत्राची व अहवालाची प्रींट मारावी लागली.

८. **वकृत्त्व स्पर्धा**ः दि. १४ डिसेंबर २०१३ रोजी दुपारी २.४० वकृत्त्व स्पर्धेला सुरूवात झाली. त्यामध्ये उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा सतीश प्रकार अहिरे या स्वयंसेवकाने सहभाग घेतला होता. त्याचे भाषण खुप छान




वकृत्त्व स्पर्धेत **अहिरे सतीश प्रकाश** या स्वयंसेवकाला मिळालेले पारितोषिक स्वीकारताना संघनायक

रंगले होते. प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. वकृत्त्व स्पर्धेचे **दुसरे पारितोषिक** त्याला प्राप्त झाले.

**९. निबंध व भितीचित्र स्पर्धा**: दि. १४ डिसेंबर रोजी दुपारी २.४० मिनीटांनी वकृत्त्व स्पर्धेसोबतच निबंध लेखन आणि पोस्टर पेंटीग स्पर्धा देखील सुरूवात झाली. त्यापैकी निबंध लेखन स्पर्धेत धनगर इश्वर






रामहरण व लोखंडे प्रतिभा दिलीप यांनी सहभाग घेतला. अपूर्ण तयारी व व्याकरणातील चूकांमुळे अपयश आले. तर भिती चित्र स्पर्धेत सोनवणे मिनाश्री आणि मासुळे घनश्याम या दोन स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता.

**१०. पथनाट्य स्पर्धा**: दि. १५ डिसेंबर २०१३ रोजी सकाळी ९.०० वा. स्पर्धेला सुरूवात झाली. आपल्या




स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी भारतातील सत्य परिस्थिती या विषयावर पथनाट्य सादर केले. परंतु माईक वापरण्यास मनाई असल्या कारणास्तव मुलांचा आवाज कमी पडला.

**११.काव्य वाचन स्पर्धा**: दि. १५ डिसें. ला सकाळी ११.३० वा. काव्यवाचन स्पर्धेला सुरूवात झाली. त्यामध्ये आपल्या विद्यापीठातून सैदाणे दिपक किशोर आणि वाघ धनश्री संजय या दोन स्वयंसेवकांनी



सहभाग नोंदविला. काव्यवाचन स्पर्धेचे थिम स्त्री-पुरूष समानता ही होती. परंतु सादर केलेल्या कविता फारशा चांगल्या नसल्याने प्रभाव पाडू शकल्या नाहीत.

**१२. लोकवाद्य वादन स्पर्धा**: दि. १५ डिसेंबर २०१३ रोजी दुपारी २.३० वा. लोकवाद्य वादन स्पर्धेला सुरूवात झाली होती. त्यामध्ये आपल्या विद्यापीठातून शिरवळकर श्रीपाद प्रदिप या विद्यार्थ्यांने सहभाग घेतला होता. स्पर्धेत त्याने निवडलेले वाद्य तबला हे होते. त्यालाही पारितोषिकापर्यंत मज्जल मारता आली नाही.

**१३. समूहगीत स्पर्धा**: दि. १५ डिसेंबर २०१३ रोजी सायंकाळी ६.०० वा. समूहगीत गायनाला सुरूवात झाली. त्यामध्ये सोनवणे मिनाश्री, वाघ धनश्री, थोरात मालती, बागुल निशा, अहिरराव भाग्यश्री, पेंढारकर विशाखा या स्वयंसेविका विद्यार्थीनींनी सहभाग घेतला होता आणि त्यांना शिरवळकर तबला, जाधव किरण याने हार्मोनियमची साथसंगत केली होती. परंतु ऐन स्पर्धेच्या वेळी स्वर व ताल सुटल्याने पारितोषिकांपर्यंत पाहेचू शकल्या नाहीत.

**१४. काही सुचना: १)** स्पर्धांचा संघ एक-दोन महिन्यापूर्वीच निवडणे आवश्यक व त्यांचा सराव सातत्याने होणे आवश्यक आहे. **२)** निवड प्रक्रिया कार्यशाळेत अधिकाधिक गुणी स्वयंकांना कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या माध्यमातून सहभागास भाग पाडणे. **३)** निवड व सराव व्यावसायिक कलाकारांच्या माध्यमातून करून घेतल्यास अधिक फायदेशीर ठरू शकतो. **४)** संघात व सराव कार्यशाळेत फक्त राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रथम वर्षाच्या स्वयंसेवकास सहभागी होण्याची नियम असावा. कारण तो स्वयंसेवक किमान दोन वर्ष तरी उत्कर्षाच्या संघात आपले स्थान निश्चित केलेला असेल आणि त्याला उत्कर्ष स्पर्धेतील अनुभव असेल. **५)** संघातील स्वयंसेवकांचा ट्रेन व बसच्या प्रवासाचे सवलतीच्या दरातील टिकीटे किमान महिना-पंधरा दिवसांपूर्वीच बुक केलेले असावेत. त्यामुळे संघ व्यवस्थापकाला कोणतीही अडचण स्पर्धेच्या कालावधीत येत नाही. **६)** संघासोबत एक पुरूष संघनायक आणि एक महिला संघनायक असे दोन संघनायक असावेत.

**ठिकाण: शिरपूर** **संघनायक**

**दि. १८/१२/२०१३** **प्रा. डॉ. नागोराव शालीग्राम डोंगरे**
**एस.पी.डी.एम. महाविद्यालय, शिरपूर**

# उत्कर्ष-२०२३
# उत्कर्ष संघाचा खर्चाचा तपशील

| अ.क्र. | दिनांक | दुकानाचे नाव | खर्चाचा तपशील | रूपये |
|---|---|---|---|---|
| १. | १२/१२/२०१३ | भावसावर जनरल स्टोअर्स, धुळे | मार्कर पेन | ५०=00 |
| २. | १२/१२/२०१३ | नवजीवन बुक स्टॉल, धुळे | कार्डशीट्, कलर, गम | ११०=00 |
| ३. | १२/१२/२०१३ | धुळे ते चाळीसगांव | ट्रेन प्रवास २० X १५ | ३००=00 |
| ४. | १३/१२/२०१३ | पुणे स्टेशन ते भारती विद्यापीठ | बसभाडे २० X १५ | ३००=00 |
| ५. | १३/१२/२०१३ | स्माईल-सावित्री मार्केटींग,पुणे | चहा,नास्ता २० X १५ | ३००=00 |
| ६. | १३/१२/२०१३ | स्माईल-सावित्री मार्केटींग,पुणे | भोजन २० X ४५ | ९००=00 |
| ७. | १३/१२/२०१३ | परमार डिजिटल , पुणे | बॅनर १ X १ मीटर | ३५०=00 |
| ८. | १३/१२/२०१३ | मोबाईल शॉप, भारती विहार, पुणे | स्टॅपलर,पीन्स् बॉक्स | ६१=00 |
| ९. | १३/१२/२०१३ | प्रेम मार्केट कात्रज, पुणे | बटाटे-टोमॅटो (रॅलीसाठी) | १२०=00 |
| १०. | १३/१२/२०१३ | एस.पी. एन्टरप्राईजेस्, पुणे | अहवाह ईमेल प्रींट | ८०=00 |
| ११. | १३/१२/२०१३ | एस.पी. स्टेशनरी, भारती विहार, पुणे | पोस्टर कलर, पेन्सील | ५००=00 |
| १२. | १४/१२/२०१३ | एस.पी. स्टेशनरी, भारती विहार, पुणे | पोस्टर पेंटीग ब्रश | १३२=00 |
| १३. | १६/१२/२०१३ | तृप्ती झेरॉक्स, विद्यापीठ गेट, पुणे | समूह प्रवेशिका फॉर्म १०<br>वैयक्तिक प्रवेशिका २०<br>प्रमाणपत्र दोन सेटस् ४० | ७०=00 |
| १४. | १६/१२/२०१३ | स्माईल-सावित्री मार्केटींग,पुणे | भोजन २० X ४५ | ९००=00 |
| १५. | १६/१२/२०१३ | भारती विद्यापीठ ते पुणे स्टेशन | बसभाडे २० X १५ | ३००=00 |
| १६. | १७/१२/२०१३ | सपना पाव-वडा सेंटर, मनमाड | चहा, नास्ता २० X १५ | ३००=00 |
| १७. | १७/१२/२०१३ | मनमाड-धुळे | बसभाडे १८ X ८३ | १४९४=00 |
| १८. | १२/१२/२०१३ | धुळे-शिरपूर | बसभाडे ३ X ५३ | १५९=00 |
| | | | **एकुण** | ६४२६=00 |

- **ट्रेनची टिकिटे मोराणे महाविद्यालयाने अगोदरच काढलेली असल्याने त्या टिकिटांच्या रक्कमेचा या हिशोबात समावेश नाही. कृपया ही बाब लक्षात घ्यावी.**
- **प्राचार्य डॉ. महाजन यांच्याकडून घेतलेला ॲडव्हान्स् रूपये २५००=००**
- **मा. पंकज नन्नवरे सरांकडून घेतलेला ॲडव्हान्स् रूपये २०००=००**
- **एकूण ॲडव्हान्स् रूपये ४५००=००**
- **झालेला एकूण खर्च ६४२६=००**
- **घेणे बाकी रूपये १९२६=००**

**बाकी रक्कम रू. १९२६ हे संघनायकाने स्वतःच्या खिशातून खर्च केली आहे, तरी कृपया घेणे बाकी असलेली रक्कम रू. १९२६ त्वरीत मिळावी, ही विनंती**

**आपला विश्वासू**

**प्रा. डॉ. नागोराव शालीग्राम डोंगरे**
**एस.पी.डी. एम. महाविद्यालय, शिरपूर**